
# चंद्रमा

यत् ते भूमे विखनामि क्षिप्रं तद् अपिरोहतु

**CHANDRAPUR FOREST ACADEMY OF ADMINISTRATION, DEVELOPMENT AND MANAGEMENT, CHANDRAPUR**

Issue 02
April 2022




‘March rush’ has been a mandatory affair in the typical government system as such. As the financial year ends, the entire machinery gets busy with meeting the ends and reconciling the accounts. March is also the month of colours and spring. Academy is no exception except for the fact that March has been a busy month bussing with various activities and programs in the academy campus. One month induction training of the foresters’ batch kept the campus live with the trainees dressed up either in their khakis or in whites all the day right from morning six to late evening. Various events that made the campus more colourful and vibrant included the conference of all the field directors of various tiger reserves and Chief Wildlife Wardens from across all the states of the country. The event was hosted by NTCA and TATR in the very campus. Two days training workshop organised for the IFS officers under the MoEF & CC brought another experience and learning to the organisers and the participants. The theme being Human Animal Conflict Mitigation and Management, was discussed far and wide over the forum. Another significant event was the visit of Judicial authorities including Hon. Judges from the High Court and forest officers of various cadres for a day long workshop that had fruitful discussions regarding the intricacies of forest laws and their implementation. Visits and guidance by the Head of Forest Force, Shri.YLP Rao, and Shri.Vikas Gupta, PCCF (Personnel) too made it all the special for the academy and its team, energising and encouraging the crew. Trainee RFO visitors from the Kundal academy came in for a day or two adding colours to the campus. A day long workshop for women staff and officers and their get-together on the Women’s Day saw more than fifty ladies foresters gathering in the campus. They took along with them confidence and self-defence techniques at the end of the day.March at the campus ends with many colourful feathers in the cap of the academy paving its way for the warmth of upcoming summers and blossoms yet to be bestowed upon.


- Team Chandrama

### मुखपृष्ठाबाबत

प्रशिक्षण अनेक पद्धतीने होणारी गोष्ट आहे. आणि त्यातल्यात्यात वन प्रशिक्षण हा अत्यंत बहुआयामी विषय. मुखपृष्ठवर रेखाटलेल्या चित्रात वनांचे दोन महत्वाचे घटक म्हणजे वृक्ष आणि पशु आणि त्यांची मानवाशी होणारी अन्योन्यक्रिया. वनांचे संवर्धन हे बरेचसे याच क्रियेवर आधारलेले. वनप्रशिक्षण हे बहुतांशी या वृक्षवल्ली आणि पशूंच्या सानिध्यात होणारी गोष्ट. काही ठराविक बाबी चार भिंतीतील वर्गखोल्यांतून शिकता येण्यासारख्या. प्रशिक्षक मात्र दोन्हीकडे महत्वाचा. मग तो निसर्ग स्वत: असो किंवा हाडामासाचा माणूस असो!

# देशभरातील भारतीय वनसेवा अधिकाऱ्यांसाठी मानव वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनावर ऑनलाइन कार्यशाळा




**चंद्रपूर :** महाराष्ट्रासह देशभरात मानव वन्यजीव संघर्षाच्या वाढत्या घटना लक्षात घेता त्यावर चर्चा करण्याच्या उद्देशाने केंद्रिय वने, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालयाच्या सहकार्याने चंद्रपूर वन प्रशासन, विकास आणि व्यवस्थापन प्रबोधिनी येथे ४ ते ५ मार्च या कालावधीत भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांहाठी मानव वन्यजीव संघर्ष व्यवस्थापन या विषयावर ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन सेवानिवृत्त प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) म राज्य श्री. नितीन काकोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) म राज्य श्री. सुनील लिमये हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते.

श्री. नितीन काकोडकर यांनी चंद्रपूर व परिसरातील वाढत्या मानव वन्यजीव संघर्षाच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली. तसेच अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी मानव वन्यजीव संघर्ष व व्यवस्थापन पद्धतीची माहिती दिली. तसेच वन अधिकाऱ्यांनी अत्यंत सजग राहून संघर्षाच्या घटना कमी करण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. मानव वन्यजीव यांच्यातील संघर्षामुळे मानवी जीवन आणि मालमत्ता यांचे नुकसान होत आहे. तसेच वन्यजीव देखील धोक्यात येतात. त्यामुळे या दोहोंमध्ये होणाऱ्या संघर्षाला विविध पातळ्यांवर समजून घेणे आवश्यक आहे. तसेच त्यावर सखोल चर्चा होऊन उपाय शोधणेही आवश्यक आहे, असेही काकोडकर यांनी नमूद केले.

शहरी आणि निमशहरी परिसरात बिबट्यांचे वास्तव्य आणि त्यातून निर्माण होणारे संघर्ष याकडे श्री. लिमये यांनी लक्ष वेधले. शहरी भागात बिबट्यांचे वास्तव्य वाढत असल्याची विविध कारणे त्यांनी नमूद केली. तसेच त्यावर कशाप्रकारे उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्यावर वन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळेत वन विभागातील अधिकारी तसेच स्वयंसेवी संस्थांमधील तज्ज्ञ यांच्या सहभागातून विविध पैलूंवर चर्चा करण्यात आली. तसेच मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्याच्या उद्देशाने उहापोह करण्यात आला. त्यासोबतच मानव वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनातील नव्या संकल्पना, स्वयंसेवी संस्थांची भूमिका आणि विविध कायदेशीर तरतुदी यावर प्रकाश टाकण्यात आला.

सत्र संचालिका म्हणून अपर संचालक पियुषा जगताप (भा.व.से.) यांनी तर सहायक म्हणून उपसंचालक शितल नांगरे यांनी जबाबदारी पार पाडली.

## Human-Wildlife Conflict Mitigation and Management

The acronym HWCM (Human Wildlife Conflict Mitigation) has been in rampant use since last few years as more and more incidences pertaining to strained interactions between the wild and the so called civilized are constantly rising. Various reasons as to why these conflicts are on a surge need to be discussed with reference to various scenarios. For example, with respect to rising casualties in the Vidarbha region of Maharashtra state due to tiger attacks, it has become imperative to assess the reasons for growth in tiger population and their dispersal outside the protected areas in the human dominated landscapes in search of unoccupied territories. Also abundance of domesticated cattle as prey and honeycombed forests dotted by intermittent villages and farmlands provide enough space for hideouts and birthing of new generation of tigers in the area. Same is the case with elephants in the central Indian landscapes and in some places in the Western Ghats. Encroachments, buildings and permanent fencings on the traditional pathways used for migration by a group of elephants, changing cropping patterns providing preferred food like sugarcane for these mesmerizing giants, bring them close to the human dominated landscapes. Leopards sneaking into the 'rurban' and urban scenarios especially in and

around perennial sugarcane crop, providing habitat round the year has become huge issue in Mumbai and western parts of Maharashtra. Straying of the Indian Gaurs, poaching at the fringes and in the non-protected areas, and many more interactions between the human and the wild involve conflict and loss of human life, assets and life of the wild animals as well. Keeping this in mind, the need has arisen to understand, discuss and find ways to mitigate this conflict at different levels.

Foresters, as first hand managers of the wildlife, deal with many such situations in their professional capacities. It is necessary to get them onboard to share their experience and discuss and document the best practices that can be followed throughout the country. Human Wildlife Conflict Mitigation involves many stakeholders. Local population in the affected areas, their outlook, levels of tolerance and co-existence with the wildlife in the area matters. Non-governmental organizations also play an important role in influencing people, crowd management and technical support in few places. They also act as ground level informers and rescuers due to their wide public reach. Hence involvement of NGOs as stakeholders is an important component for such situations. Policy level interventions, specially in the cases of huge amount of crop and livestock losses due to wild animals, assessing and declaring few species as vermin, giving hunting permits require adequate political will and bureaucratic interventions. Hence the involvement of stake holders too needs to be considered while discussing HWCM.

This training program aimed at having conversation, inputs from field personas, experts and all possible stakeholders on the issue to derive solid conclusions, share best practices and implement them as required by the field officers.

# भारतातील व्याघ्र प्रकल्पांचे क्षेत्र संचालक व मुख्य वन्यजीव रक्षक यांची परिषद






राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या पुढाकाराने महाराष्ट्र वन विभाग व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांनी चंद्रपूर वन प्रबोधिनी येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले. विविध राज्यातील मुख्य वन्यजीव रक्षक तसेच देशभरातील ५२ क्षेत्र संचालकांनी या चर्चासत्रात सहभाग घेतला. देशभरात वाघांची संख्या वाढविण्यासाठी काम सुरू असतांना महाराष्ट्रातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पाने मात्र वाघाच्या संख्येत आघाडी घेतली. राज्यातील एकूण वाघांपैकी २५० वाघ एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. त्या अनुषंगाने येथील व्यवस्थापन पध्दती व बदलती आव्हाने या विषयांवर विचार मंथन करण्यात आले.

वाघांची संख्या वाढत असतानाच मानव वन्यजीव संघर्ष देखील अधिक वाढत चालला आहे. या बदलत्या परिस्थितीची कारणमिमांसा करणे, प्रभावी व्यवस्थापन पध्दतीचा अभ्यास व अंमलजावणी करणे आणि मानव वन्यजीव संघर्ष कमी करून पर्यायी रोजगार व विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे याबाबत या चर्चासत्रात सखोल चर्चा झाली.

या प्रसंगी श्री. वाय. एल.पी.राव, भा.व.से. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र वन विभाग, श्री. एस. पी. यादव, भा.व.से. अपर महासंचालक (वने) व सदस्य, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, श्री. राजेश गोपाल, भा.व.से. महासचिव, जागतिक व्याघ्र मंच, श्री. सुनिल लिमये, भा.व.से. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र वन विभाग व श्रीमती. तिलोत्तमा वर्मा, अपर संचालक वन्यजीव अपराध नियंत्रण ब्युरो, श्री. जसविरसिंह चौहान, भा.व.से. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मध्य प्रदेश वन विभाग, तसेच देहरादून येथील राष्ट्रीय वन्यजीव संस्थेचे वरीष्ठ शास्त्रज्ञ यांच्यासह अन्य ज्येष्ठ तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

# वनबल प्रमुख तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक वाय.एल.पी. राव यांची वन प्रबोधिनीला भेट



**चंद्रपूर :** चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीला राज्यातले पहिले वन विद्यापीठ म्हणून विकसित करण्यासाठी शासनपातळीवर पाठपुरावा तसेच त्यासाठी सहकार्य करण्यात येईल, असे वनबल प्रमुख तथा प्रधान मुख्य वन संरक्षक वाय.एल.पी. राव यांनी नमूद केले.

केंद्रिय वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या वतीने चंद्रपूर वन प्रबोधिनीत देशभरातील व्याघ्र प्रकल्पांच्या संचालकांची राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या परिषदेच्या निमित्ताने वनबलप्रमुख श्री. राव यांनी चंद्रपूर वन प्रबोधिनीला भेट दिली. तसेच वन प्रबोधिनीच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा चंद्रपूर वन प्रबोधिनीचे संचालक महिप गुप्ता यांनी वनबलप्रमुख श्री. राव यांचे स्वागत केले. यावेळी अपर संचालक अविनाश कुमार, अपर संचालक पियुषा जगताप, अपर संचालक प्रशांत खाडे, उपसंचालक श्रीनिवास पाचगावे, उप संचालक मनिषा भिंगे, वनपरिक्षेत्र अधिकारी चेतना म्हस्के, शैक्षणिक सल्लागार मंगेश इंदापवार प्रमुख्याने उपस्थित होते.

वन प्रबोधिनीच्या अधिकाऱ्यांसोबत अनौपचारिक चर्चा करताना श्री. राव म्हणाले की वन विभागाच्या वतीने चंद्रपूर वन प्रबोधिनीच्या विकासासाठी आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल. अत्यंत सुंदर व आधुनिक वास्तू उभारण्यात आली असून तिथे वन अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासोबतच इतर शैक्षणिक, संशोधन व विकास प्रकल्प देखील सुरू करण्यात येत असल्याचे पाहून आनंद होत आहे. वन प्रबोधिनीच्या मार्फत विविध विभागांना देखील प्रशिक्षणाची उत्तम सोय येथे निर्माण झालेली आहे, असे त्यांनी नमूद केले.

वन प्रबोधिनीच्या विकास कामांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक घेतली होती. त्यावेळी विधिमंडळ लोकलेखा समितीचे अध्यक्ष तथा माजी अर्थ व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर वन प्रबोधिनीला राज्याचे पहिले वन विद्यापीठ म्हणून विकसित करण्याची मागणी केली. सदर मागणीला मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली असून त्याबाबत लवकरच प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. सदर विद्यापीठाचा प्रारूप आराखडा वन प्रबोधिनीने तयार केला असून तो राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे, अशी माहिती संचालक महिप गुप्ता यांनी दिली. तसेच वन प्रबोधिनीला पर्यावरण व हवामान बदल या दोन विषयांच्या संदर्भात केंद्र पुरस्कृत तांत्रिक संस्था म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव केंद्रिय वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालयाकडे सादर करण्यात आला आहे, अशी माहितीही संचालक महिप गुप्ता यांनी दिली. तेव्हा या दोन्ही प्रस्तावांचा राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे श्री. राव यांनी नमूद केले. याप्रसंगी अपर संचालक अविनाश कुमार यांनी चंद्रपूर वन प्रबोधिनीच्या विविध कार्यांची माहिती सादर केली.



# जागतिक महिला दिनविशेष: आत्मरक्षणाबाबत कार्यशाळा





**चंद्रपूर** : जागतिक महिला दिनाचे निमित्ताने दिनांक ०८ मार्च २०२२ रोजी चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर येथे महिला सुरक्षा या संकल्पनेवर कार्यशाळेचे आयोजन चंद्रपूर वन प्रबोधिनी व Exploring Womanhood Foundation नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन श्रीमती. पियुषा जगताप भा.व.से. अपर संचालक चंद्रपूर वन प्रबोधिनी यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी श्रीमती. मनिषा भिंगे उपसंचालक-१, श्रीमती. शीतल नागरे उपसंचालक-२, श्रीमती. शुभांगी चव्हाण स.व.सं. सामाजिक वनीकरण विभाग चंद्रपूर तसेच श्रीमती. पल्लवी खाडे आणि श्रीमती दिपाली देवकर (संचालिका Exploring Womanhood Foundation) यांची उपस्थिती होती.

या कार्यशाळेमध्ये महिलांनी स्वतः करिता वेळ काढावा, आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्य पार पडताना स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्याकरिता देखील प्रयत्न करावा, महिलांचा आणि त्यांच्या कामाचा आदर करण्याची अपेक्षा दुसऱ्याकडून बाळगताना त्यांनी स्वतःचा आणि आपल्या कामाचा आदर करायला हवा. स्वताच्या सुरक्षिततेसाठी दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून राहण्या ऐवजी स्वतःला सक्षम करा आणि असे प्रतिपादन पियुषा जगताप यांनी केले तसेच त्यांची कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी वाव मिळावा आणि संधीची समानता हा मुलभूत हक्क मिळावा यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.


कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगीक छळ व त्यावर उपाय योजना या विषयावर दिपाली देवकर यांचेकडून विस्तृत स्वरुपाची माहिती देण्यात आली. त्याच बरोबर कामाच्या ठिकाणी महिला-पुरुष समानतेच्या दृष्टीने लिंग संवेदनशीलता रुजणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांसाठी सुरक्षाकवच म्हणून कायदे, नियम आदि जरी असेल तरी हे नियम कायदे यांचं ज्ञान प्रत्येक स्त्रीला करून देणे आणि कामाच्या ठिकाणी महिलांना काम करण्यास पूरक व सुरक्षित वातावरण उपलब्ध होणे खूप गरजेचे आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच वन विभागातील क्षेत्रीय महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता स्वसंरक्षण या विषयावर पोलिस विभागाच्या प्रशिक्षकांकडून प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये वन विभागातील क्षेत्रीय महिला अधिकारी कर्मचाऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

# प्रशिक्षणार्थी वन परीक्षेत्र अधिकाऱ्यांचा अभ्यास दौरा:



कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) येथे वनपरीक्षेत्र अधिकारी प्रशिक्षण कार्यक्रम (२०२१-२३) सुरु आहे. यासाठी दिनांक ०१.०३.२०२२ ते १२.०३.२०२२ या कालीवधीत अभ्यास दौरा आयोजीत करण्यात आला. या अभ्यास दौऱ्यादरम्यान दिनांक ०६.०३.२०२२ ते ०८.०३.२०२२ या कालावधीत सदर प्रशिक्षणार्थी वनपरीक्षेत्र अधिकाऱ्यांनी चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीस भेट दिली. या प्रशिक्षणार्थ्यांना श्री. अविनाश कुमार भा.व.से. अपर संचालक. चंद्रपूर वन प्रबोधिनी यांनी मार्गदर्शन केले. या अभ्यासदौऱ्यात बल्लारशाह काष्ठ-आगार तसेच ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासदेखील भेट देण्यात आली. बल्लारशाह येथील काष्ठ-आगाराच्या कामकाजाबाबत प्रशिक्षणार्थींनी माहिती घेतली. तसेच ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर क्षेत्राच्या व्यवस्थापनाबरोबरच बफर क्षेत्र व कॉरीडॉर व्यवस्थापन याबद्दल माहिती देण्यात आली. या बरोबरच व्याघ्र प्रगणना व कॅमेरा ट्रॅपींगचे प्रात्यक्षिक देण्यात आले.

# कायदेविषयक मार्गदर्शनासाठी कार्यशाळा







**चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश यांच्यासाठी वन व वन्यजीव संवर्धन, संरक्षण व तत्सम विषयांवर सचेतन करण्यासाठी आयोजित कार्यशाळा: उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती मा. श्री. सुनिल शुक्रे, मा. श्री. प्रकाश लोणकर (मुख्य वन संरक्षक, चंद्रपूर), मा. डॉ. जितेंद्र रामगावकर (क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प), मा. श्रीमती कविता अग्रवाल (प्रधान जिल्हा न्यायाधीश, चंद्रपूर)**

चंद्रपूर जिल्ह्यातील वनाधिकाऱ्यांना कायदेविषयक मार्गदर्शनासाठी कार्यशाळा दिनांक १३ मार्च २०२२ रोजी चंद्रपूर वन अकादमी येथे संपन्न झाली. या प्रसंगी मा. श्री. शुक्रे, न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय हे अध्यक्षस्थानी होते. तसेच श्रीमती. कविता अग्रवाल, प्रमुख जिल्हा न्यायाधीश, चंद्रपूर, श्री. प्रकाश लोणकर, मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर (प्रा) व डॉ. जितेंद्र रामगावकर, क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर हे मंचावर उपस्थित होते.

या कार्यशाळेत भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ याबाबत विविध न्यायाधिकारी तसेच वरिष्ठ वनाधिकारी यांनी मार्गदर्शन केले. न्यायालये ही शिक्षा देण्यासाठी नसून न्याय देण्यासाठी असतात. त्यामुळे कोणत्याही प्रकरणात योग्य तपास झाल्यास बाधितांना न्याय मिळणे शक्य होते असे मत मा. श्री. शुक्रे, न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांनी अध्यक्ष पदावरून बोलतांना मांडले.

# पर्यावरणाचा होणार शास्त्रीय अभ्यास
# वन अकादमी व संस्कृत विद्यापीठात सहयोग होणार

चंद्रपूर : निसर्ग, पर्यावरण आणि वन्यजीव या तीन क्षेत्रात शास्त्रोक्त अभ्यास, विविध शैक्षणिक व प्रशिक्षण उपक्रम राबवण्याच्या अनुषंगाने चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी आणि कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांच्यामध्ये लवकरच सामंजस्य करार होणार आहे.

वन प्रबोधिनीचे संचालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक महिप गुप्ता यांनी नुकतेच रामटेक येथील संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मधुसूदन पेन्ना यांची भेट घेतली. यावेळी कुलसचिव रामचंद्र जोशी, अपर संचालक प्रशांत खाडे आणि शैक्षणिक सल्लागार मंगेश इंदापवार उपस्थित होते.

वन प्रबोधिनीच्या माध्यमातून संस्कृत विद्यापीठाच्या रामटेक आणि वारंगा येथील परिसराचा हरित विकास करण्यात येत आहे. दोन्ही ठिकाणच्या परिसरात सुमारे १५ हजाराहून अधिक वृक्षलागवड वन अकादमीच्या माध्यमातून करण्यात येत आहे. त्या कामाचा आढावा देखील बैठकीत सादर करण्यात आला.

दरम्यान, संस्कृत साहित्य, वेद व पुराणात निसर्ग, पर्यावरण, वन्यजीव, वृक्ष याबाबत विविध शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे वन अकादमीच्या माध्यमातून यासंदर्भात विविध अभ्यासक्रम सुरू करता येतील, असा प्रस्ताव कुलगुरू डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी मांडला. रामटेक विद्यापीठाच्या परिसरात व्याघ्र प्रकल्प, वनाच्छादित प्रदेश आहे. तेथील युवकांना रोजगारक्षम



करण्यासाठी विविध प्रमाणपत्रे व पदविका अभ्यासक्रम वन प्रबोधिनीच्या सहकार्याने सुरू करण्याबाबतही कुलगुरू पेन्ना यांनी विचार मांडले.

वन प्रबोधिनीला राज्य शासनाने वने, वन्यजीव, पर्यावरण व हवामान बदल अशा चार मानकांवर कार्य करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. तसेच राज्यातील विविध विद्यापीठांसमवेत शैक्षणिक सामंजस्य करार करून वनोपज कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यामुळे संस्कृत विद्यापीठासमवेत अशा प्रकारचे अभ्यासक्रम सुरू करता येतील, असे संचालक महिप गुप्ता यांनी नमूद केले.

# पदोन्नत वनपालांचे एक महिन्याचे प्रशिक्षण

चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी (चंद्रमा) येथे वन विभागातील पदोन्नत वनपालांचे एक महिन्याचे प्रशिक्षण दिनांक १६.०२.२०२२ ते १६.०३.२०२२ या कालावधीत आयोजीत करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी श्री. एस.एच. पाटील, भा.व.से. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (से.नि.) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जैवविविधता महामंडळ, श्री. प्रकाश लोणकर, भा.व.से. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, श्री. अविनाश कुमार, भा.व.से. अपर संचालक, वन प्रबोधिनी चंद्रपूर, श्रीमती. पियुषा जगताप, भा.व.से. अपर संचालक (प्रशिक्षण), वन प्रबोधिनी चंद्रपूर, श्री. प्रशांत खाडे, अपर संचालक, म.व.से. (मुख्यालय), वन प्रबोधिनी, चंद्रपूर हे देखील उपस्थित होते. या प्रशिक्षण सत्रामध्ये वन व वन्यजीव व्यवस्थापना बरोबरच मानव वन्यजीव संघर्षसह विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. या समारोप व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाप्रसंगी बोलतांना श्री. प्रकाश लोणकर म्हणाले की या प्रशिक्षणाचा उपयोग क्षेत्रीय स्तरावर काम करतांना नक्कीच होईल. तसेच वनपालांना विविध प्रकारची कामे करतांना येणाऱ्या अनेक शंकांचे निराकरण करून घेण्याची संधी अशा प्रकारच्या प्रशिक्षणातून उपलब्ध होत असते. विविध विषयावरील तज्ज्ञ व्याख्यात्यांना वन प्रबोधिनीत पाचारण करून सदरचा प्रशिक्षण कार्यक्रम परिपूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न वन प्रबोधिनीमार्फत करण्यात येत आहे. त्यामुळे भविष्यात आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षणासाठी देखील कर्मचाऱ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

चंद्रपूर वन प्रबोधिनीतून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर जवळपास तीन दशकांनंतर येथे पुन्हा येतांना आणि प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणाऱ्या वनपालांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतांना अतिशय आनंद होत असल्याचे श्री. एस.एच पाटील यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती. पियुषा जगताप, अपर संचालक (प्रशिक्षण) यांनी केले. त्यांनी संपूर्ण महिनाभरात राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालक श्रीमती. निकीता कन्नमवार यांनी केले.

श्रीमती. मनिषा भिंगे, उपसंचालक यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन कु. चेतना म्हस्के, वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी पाहिले. या कार्यक्रमाला श्री. सुहास बढेकर, उपसंचालक तथा प्रशिक्षण सत्र संचालक, श्रीमती. शितल नांगरे, उपसंचालक, श्री. श्रीनिवास पाचगावे, उपसंचालक तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.







# पदोन्नत वनपाल प्रशिक्षणातील क्षणचित्रे















# पदोन्नत वनपालांचे उजळणी प्रशिक्षण (दुसरी तुकडी)





पदोन्नत वनपालांच्या एक महिन्याच्या उजळणी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दुसऱ्या तुकडीचे प्रशिक्षण दिनांक २३.०३.२०२२ ते २१.०४.२०२२ या कालावधीत चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षण सत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी सत्र संचालिका श्रीमती. शितल नांगरे, उपसंचालक (शिक्षण-१) यांनी प्रशिक्षणाचे प्रास्ताविक केले. मा. श्री. अविनाश कुमार, अपर संचालक (प्रशिक्षण) यांनी प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. महिनाभराच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये शिकविण्यात येणाऱ्या विषयांचा उपयोग कार्यरत कालावधीमध्ये अवश्य होईल. प्रशिक्षण पूर्ण करून जातांना सर्व प्रशिक्षणार्थी नवीन उर्जा घेऊन जाणार आहेत. या करीता सदर कालावधीचे प्रशिक्षणाचा पुरेपूर फायदा करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी श्रीमती. मनिषा भिंगे, उपसंचालक-१ व श्री. सुहास बढेकर, उपसंचालक (शिक्षण-२) मंचावर उपस्थित होते. प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्र संचालिका श्रीमती. शितल नांगरे, उपसंचालक (शिक्षण-१) चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, चंद्रपूर यांनी केले. प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्था कु. चेतना म्हस्के, वनपरिक्षेत्र अधिकारी, वन प्रबोधिनी, चंद्रपूर यांनी पाहिले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती. निकीता कन्नमवार, लेखापाल यांनी केले. कार्यक्रमाला चंद्रमाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**सदिच्छा भेट...**

१९८३ तुकडीचे महाराष्ट्र व गुजरात येथील सहाय्यक वनसंरक्षक यांनी चंद्रपूर वन अकादमीला सदिच्छा भेट दिली. आजमितीस हे सर्व अधिकारी सेवानिवृत्त असून त्यांनी महाराष्ट्र व गुजरात राज्यामध्ये आपल्या दीर्घकालीन सेवेत उत्तमोत्तम कामे केलेली आहेत.

# जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ताने



साधारण ३-४ वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. माझी मुलगी पहिलीला होती. फुलपाखरांच्या मागे पळणे, किडे पकडणे, अळ्यांना प्रेमाने झाडावर नेऊन सोडणे हे २० वर्षापूर्वी गाव-खेड्यात खेळले जाणारे खेळ ती आताही खेळत होती.

अशातच आपण काहीतरी जनावर पाळलं पाहिजे अशी तीव्र भावना तिच्या मनात वारंवार येत होती. वयाच्या मानाने तिच्या या यादीत मोठा कुत्रा, वाघाचं पिल्लू, ससा, रंगीत सरडा, मोर, पोपट, चिमणी, मासे, कासव, ऑक्टोपस अशी काही नावं होती.

ती अशा नादात असताना मी जंगलात निघालो की ती हमखास गच्चीत उभं राहून मला ओरडून विचारायची, बाबा, आज वाघाचं पिल्लू नक्की आणणार ना? नाही मिळालं तर हरीण किंवा ससा पण चालेल! तिच्या गोल गोल डोळ्यात दिसायचं की बाबा संध्याकाळी नक्कीच गळ्यात दोरी बांधून वाघ आणणार.

अर्थात बिचारीचं असं कोणतंच स्वप्न पूर्ण होण्यासारखं नव्हतं. पण मी तिला बाप म्हणून असं स्पष्ट कधी सांगू शकलो नाही. दरम्यान तिनं कढीलिंबाच्या झाडावर लिंबोळी फुलपाखराच्या अळ्या आईशी भांडून-रडून पाळल्या. अळ्या पानं खाऊन संपवताहेत म्हणून आईचा जीव रोज वर-खाली व्हायचा आणि अळ्या किती पटापट खाऊन पान संपवतात याचा पोरीला परमानंद. अर्थात् नवऱ्यापेक्षा बाप म्हणून अनेकदा मला पोरीची वकिली करावी लागली. त्या अळ्यांची फुलपाखरं होऊन उडून गेली यात तिला आनंद.

तिच्या काकाच्या लग्नाला गेलो. पूजेच्या दिवशी आत होम-हवन सुरु. ही बाई मला हाताला धरुन ओढायला लागली. मी उठून बाहेर गेलो. लालचुटूक ओठाची एक चकचकीत सापसुरळी बाहेर सकाळच्या उन्हाला येऊन बसली होती. आमच्या लाडोबाला एक नवीन पेट सापडला होता. मग मी ती सापसुरळी एका बिसलरीच्या बाटलीत घालून तिला दिली. तिनं खूश होऊन ती आत होम सुरु होता तिथं आईकडं दाखवायला नेली आणि पूजेला बसलेल्या तमाम काकू, मावशा, आज्यांचा जीव हातात आणला.

खेळायला गेली अन् फुलपाखरु दिसलं की खेळ सोडून त्या फुलपाखरामागं फुलपाखरु होऊन उडत जाणार. जर फुलपाखरु बसलं तर पंखाला हात न लावता ते अलगद हातावर घेण्याची कला ती शिकली.

एक दिवस तिनं तिचा अजून एक पेट आणून घरात ठेवला, 'ड्रॅगी'. ड्रॅगी चांगला चार इंच लांब आणि करवतीसारख्या काटेरी पायांचा प्रार्थनाकीटक होता. तो घरात झाडाच्या पानावर बसला. पण दुस-या उजाडताच खिडकीतून त्याच्या जगात उडून गेला. त्याची मालकीण शोधून शोधून रडली त्याला. आता दुस-या पेटचा शोध सुरु झाला.

नेमक्या अशा काळात तिच्या शाळेने 'टाकाऊपासून टिकाऊ' अशी स्पर्धा घ्यायचं ठरवलं. झालं. घरी येऊन कचरा गोळा करून वॉल हँगिंग करायला बसली. ते काही मनाजोगतं साधलं नाही. सोडून दिलं. आता दुसरं काय? माझ्या मागे लागली.

म्हटलं, ''चिमण्यांसाठी घर करतेस का?'' तिचे डोळे एकदम लकाकले. त्याच दिवशी कचऱ्यात टाकलेलं एक खोकं होतं. ते घेऊन तिला मी बर्ड नेस्ट कसं असतं ते समजावून सांगितलं. तिला ते खोकं, दोरा आणि एक कात्री दिली.

एका पेन्सिलनं खोक्यावर उभ्या आडव्या रेषांनी तिनं मापं घेतली. खोकं उभं मांडून त्याला गोल दार आखून घेतलं. खोकं बांधायला वरच्या बाजूनं छिद्रं करण्यासाठी पेन्सिलनं खुणा केल्या. एकएक गोष्ट करताना मला दाखवून माझ्याकडून होकार घेत होती. आता जीभ ओठांत मुडपून तिनं गोलसर दार कापून घेतलं. चार कोपऱ्यात टोचून छिद्रं केली. त्यात दोरे बांधून घेतले. एकदा समोर धरुन पाहिलं आणि खूश झाली.

दुसऱ्या दिवशी ऐटीत जपून ते घर तिनं शाळेत नेलं आणि स्पर्धेत ठेवलं. तिथं आई-बाबांच्या मदतीनं मुलांनी केलेल्या काही कलाकृती आणि मुलांच्या मदतीनं आई-बाबांनी केलेल्या काही कलाकृती, मॉडेल्स, वॉल हँगिंग वगैरे सगळ्या चकाचक मांडणीत आमच्या कलाकाराच्या अननुभवी हातांनी वाकडं-तिकडं कापून केलेलं बर्ड नेस्ट तितकं सफाईदार नक्कीच नव्हतं.

एक-दोनदा समजावून घेऊन तिनं कोणाचीच मदत न घेता स्वत: केलेलं ते घरटं पाहून बाप म्हणून माझं कौतुक आभाळभर होतं, पण परिक्षकांनी अर्थातच ते घरटं विचारात घेतलं नाही. त्याचं सर्वसाधारण रूपडंही असं होतं की ते प्रदर्शनात न ठेवता तिला परत दिलं.

झाऽऽलं. इतक्या कष्टानं केलेलं ते घरटं नेलं तसं परत आणणं या बाईला काही सहन झालं नाही. दिवसभर भल्या जोरानं दाबलेलं रडू घरी आल्याबरोबर घरभर मोकळं मोकळं वाहिलं.

मी संध्याकाळी आल्यावर घरटं मांडीत ठेवून तिनं पुन्हा एकदा शाळेची तक्रार मला सांगितली. मी म्हटलं, ''भारीच! आधी टाळी दे.'' तिला अजून रडू फुटलं. मग मी तिला सांगितलं, ''बरं झालं. आपलं इतकं छान घर त्यांनी परत दिलं. आता आपण ते गच्चीत लावू, म्हणजे त्याच्यात चिमण्या घर करतील. त्यांची पिल्लं त्यात राहतील. तुला चिमण्या पाळायच्या होत्या ना!''

भोलाराम खुश. येस! येस!! येस!!!

तिनं घरटं घेतलं आणि बाहेर जाऊन जागा शोधू लागली. इतक्यात तिला खूप मोठ्ठी अडचण जाणवली. घरट्याला सजवायला हवं होतं. त्याचं नियोजन काहीच नव्हतं. बाबा! चिमण्यांना छान कसं काय वाटणार याच्यात? त्या खुश खुश रहायला पाहिजेत. मग गुलाबी कागद कापून केलेला बो, तुटलेल्या माळेचे चमकदार मणी, फेव्हीकॉल आणि स्केचपेन घेऊन सजावट झाली.

माझ्या मागं लागून ते घरटं तिनं भिंतीवर लावून घेतलं. त्या रात्री झोपताना तिला गोष्ट सांगावी नाही लागली. डोळे मिटून ती म्हणाली, ''बाबा, मला चिमण्यांची मुव्ही दिसत आहे''.

सकाळी उठून आधी तिनं बाहेर जाऊन पाहिलं, चिमण्या आल्या का? मग 'त्या लगेच का येणार नाहीत? अशा घरट्यात यायला का वेळ लागतो?' हे सारं तिला समजावलं.

तरी तिचा दिवसाआड तपास राहायचाच; चिमण्या आल्या का? .... आणि एक दिवस सकाळीच दाराशी चिवचिवाट सुरु झाला. चिमण्यांनी घरटं स्वीकारलं होतं.

पुढं यथावकाश त्यांना मुलं-बाळं झाली. पिढ्या वाढत गेल्या. अजूनही त्याच घरट्यात त्यांचा सुखाचा संसार सुरु आहे. येत्या ८-१५ दिवसात पुन्हा खुषखबर अपेक्षित आहे!!!

– शतानिक भागवत

**20th March World SPARROW Day!**



## उत्साहाचं लेणं

४ जानेवारीची लगबग, एक आठवडा नाही, नाही. १० दिवस आधीपासूनच तयारी सुरू झाली होती. प्रशिक्षणार्थी आदिम जमातीचे, अशिक्षित असतील. त्यांना प्रशिक्षण म्हणजे काय? कसं असतं? सगळं काही समजावून सांगावं लागेल, असे वाटायचं. त्यांना काय द्यावे तर चंद्रमाची टोपी व चंद्रमाची पाण्याची बाटली द्यायचं ठरलं. आम्ही तर ५० ची तुकडी ठरवली होती. तशा आमच्या २५-३० प्रशिक्षणार्थ्यांच्याच तुकड्या असतात. पण कोव्हीड-१९ ची परिस्थिती व निकट येणारा मार्च पाहता ५० च्या ४ तुकड्या घेऊन २०० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण द्यायचे ठरले. आम्ही कधी कल्पनादेखील केली नव्हती, असे अनुभव आम्हाला कृषी व पशुसंवर्धन प्रशिक्षणाने दिले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर कार्यालयाने प्रशिक्षणार्थ्यांची ने-आण करण्याकरीता एक समन्वयक नेमून दिले. ३ जानेवारीला बस पाठविली, असं वाटलं येतील का महिला शेतकरी? कसं होईल प्रशिक्षणार्थी खूपच कमी येतील तर. वगैरे वगैरे बरेच प्रश्न होते मनात. संध्याकाळी बघतो तर काय ! एकूण ५८ प्रशिक्षणार्थी होते व एक समन्वयक असे मिळून ५९ महिला होत्या. अजून एक गमतीची गोष्ट म्हणजे बऱ्याच स्त्रिया त्यांच्या लहान मुलांनादेखील सोबत घेऊन आल्या होत्या. सगळेच अनुभव सगळ्यांनाच नवीन होते, प्रशिक्षण घेणाऱ्यांनाही आणि प्रशिक्षणास आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाही.

अखेर ४ जानेवारीचा दिवस उजाडला. सर्व महिला लगबगीने तयार होऊन आपल्यासोबत आपल्या मुलांनादेखील प्रशिक्षणाकरीता घेऊन आल्या. ५८ पैकी १०-१२ च महिला शिकलेल्या होत्या. ज्यांना लिहिता-वाचता येत होतं. अर्ध्या महिलांना नाश्ता करायला पाठवून अर्ध्या महिलांची नाव नोंदणी करून त्यांना साहित्य वाटप करण्यात आलं, नंतर त्यांना नाश्त्याला पाठवून उर्वरीत महिलांची नाव नोंदणी करून साहित्य वाटप करण्यात आले. पण एवढ्यात एक गोष्ट लक्षात आली की, या आदिवासी महिला शिस्तीच्या बाबतीत खूप काटेकोर असतात. रांगेत म्हटलं की एकदम रांगेत. एकही महिला रांगेच्या बाहेर नव्हती. दिलेल्या टोप्या घालून प्रशिक्षणार्थी खूप उत्साहात जणू एखादा उत्सवच! उद्घाटनाकरीता आलेले प्रमुख पाहुणेदेखील भारावून गेले. आपल्याला व्यक्तीच्या शिक्षणावरून त्याला पारखण्याची सवय पडून गेली आहे.



परंतु शिक्षणापलीकडील अनुभवाची शिस्त मात्र या महिला नकळत आम्हालाच शिकवून गेल्या. पहिल्या दिवशी थोडे कष्ट घ्यावे लागले की, जे शिकवत आहेत ते तुमच्यासाठीच आहे. कारण सर्व शेतकरी महिला होत्या. शेतीमध्ये पुरूषांचा कष्टाचा वाटा जास्त आहे हे वरवर जरी दिसत असलं तरी स्त्रियांच्या कष्टाला मोल नसते. कारण घरचं सगळं करून ती शेतात पण तेवढ्याच उत्साहाने काम करते. अगदी तोच उत्साह त्या प्रशिक्षणामध्येही दाखवत होत्या.

दुसरा दिवस उगवला. आजचा दिवसही थोडी कसरतच होती. आज दुपारी अभ्यास दौरा असल्याने सकाळचं सत्र थोडं लवकरच घ्यायचं होतं. पुन्हा दुसऱ्या दिवशीही तोच उत्साह, त्याच शिस्तीचं दर्शन घडलं. सर्व काही, अगदी अभ्यासदौरादेखील शिस्तीतच पार पडला. मास्क पहिल्या दिवशी जसा होता आज पण तसाच तोही शिस्तीमध्ये होता बरं का ! आदिवासी महिला अजूनदेखील मासिक पाळी दरम्यान गावाबाहेरील एका घरामध्ये राहतात. जवळपास ७ दिवस. त्याकरीता जागृती तसेच त्यांच्या आरोग्याकरीता अभ्यास दौऱ्यानंतर महिला डॉक्टरांना माहिती देण्याकरीता बोलावले होते. त्यावेळी देखील असं वाटलं की या प्रतिसाद देतील की लाजून शांत बसतील. पण ह्यावेळीसुध्दा त्यांनी न लाजता डॉक्टरांसोबत संवाद साधला. त्यानंतर वाटलं अजून थोडं थांबू, बघू आपल्याला अजून काय काय नवीन बघायला मिळतं. तर त्यावेळी त्यांचं अप्रतिम लोकनृत्य आम्हाला करून दाखविले. मोबाईल संस्कृतीने अजून त्यांना घेरलं नाही. म्हणून की काय प्रत्येक सणासुदीला ते उत्साहाने नृत्य करून आपला आनंद साजरा करतात.

आता होता ३ रा दिवस. या दिवशीपण त्यांचा उत्साह व शिस्त वाखाणण्यासारखी होती. दोन सत्र झाले त्यानंतर त्यांना हवं तसं झणझणीत जेवण आमचे कॅटरर सरकारजींनी बनवून घेतलं होतं. त्यानंतर होता समारोपाचा कार्यक्रम. या कार्यक्रमामध्ये त्यांना परसबागेत लावण्याकरीता बियाण्यांचे किट देण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रमाणपत्र घेतांना जो आनंद व आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर पाहिला तो पाहून खरंच उर अभिमानाने भरून आला. खरंच बऱ्याच महिला अशिक्षित होत्या पण त्यांच्या उत्साहाला, शिस्तीला व स्वाभिमानाला तोड नव्हती. अगदी आमच्यासारख्या शिकल्या-सवरलेल्या व्यक्तीला लाजवेल असं त्यांचं तेज होतं. या प्रशिक्षणाने त्यांच्या आयुष्यात अजून थोडाफार काही चांगला बदल झाला तर तो मी आमच्या वन अकादमीचे व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे यश समजेन. मी शाळा शिकताना आमच्या शाळेचे मुख्याध्यापक प्रत्येक वेळी शाळेत कोणताही कार्यक्रम असला तरी आम्हाला नेहमी म्हणायचे, ''तुम्हाला ज्वाला बनता आलं नाही तरी चालेल, पण समईतील ज्योत तरी बना''. तसंच या आदिवासी कोलाम जमातीच्या महिलांच्या आयुष्यामध्ये थोडा जरी चांगला बदल घडला तरी फूल नाही फुलाच्या पाकळीच्या आशावादाप्रमाणे काहीतरी बदल नक्कीच घडेल.

शितल नांगरे
उपसंचालक (शिक्षण-१)
चंद्रपूर वन प्रबोधिनी, चंद्रपूर

## चंद्रमा

आगळा वेगळा सप्तरंगी सोहळा
चंद्रमा, मजसाठी स्वरंच तू निराळा // / धृ //
तुझे रुप, तुझा साज, नभी तुझे वैभव
पारणे फेडीशी मम, नेत्र ते निरव
तुझी आस, तुझा ध्यास,
व्हावे तवसम शितल, हिच मनी आस
व्हावा तव छायेत, धुंद हा मावळा
चंद्रमा मजसाठी स्वरंच तू निराळा // / १ //

चंद्रमा तुझे आम्हास
मंद शितल प्रकाशी न्याहळणे
चांदण्या, प्रकाशी नाहणे
त्यास तोड ह्या नभी, नाही
देह हा भासला तव प्रकाशी आगळा
चंद्रमा, मजसाठी स्वरंच तू निराळा // / २ //

चंद्रमा तुझे ते लोभस मृदू वागणे
अन मायेने मानवास आपूलेसे करणे
आपूलकीचा प्रेमझरा मानवात रुजविणे
धन्यता मानू मनी, हाच ध्यास आगळा
चंद्रमा, मजसाठी स्वरंच तू निराळा // / ३ //

चंद्रमा, तूझे कळत नकळत मायेचे होणे
मनाशी बोलणे, मंत्रमुग्ध वागणे
या मनाशी जोडते, तुझे ते प्रमाचे नाते
निसर्गात जोडले, तव मम अतूट नाते
नतमस्तक मी आशिर्वाद दे या अजाण बाळा
चंद्रमा, मजसाठी स्वरंच तू निराळा // / ४ //

नरेंद्र किसनराव देशकर
वनपाल

# मधली सुट्टी

मला आठवतो सन २०१४ चा तो दिवस. फार कडाक्याची थंडी आणि त्या दिवशी घडलेला प्रसंग.

ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्प (कोर), चंद्रपूर चे कार्यालय, आम्ही सर्व मैत्रीणी रोज ठरवायचो की, एक दिवस आपण सर्व महिला कर्मचारी कार्यालयासमोरील झाडाखाली दुपारी भोजन करू. रोज दुपारच्या जेवणाचे वेळी आठवण यायची की, आपण तर एकत्र येणार होतो पण प्रत्येकाची वेळ जुळून येत नव्हती. यानंतर एक दिवस आलाच की सर्व कार्यालयात हजर होताच, दुसऱ्या दिवशी ठरलं की आपण झाडाखाली जेवायला बसायचंच. ठरलं तर मग!

ठरल्याप्रमाणे सर्वांनी आवडीचे पदार्थ आपापल्या डब्यात आणण्याचा बेत आखला व त्याप्रमाणे डबे विविध पदार्थांनी पूर्णपणे भरले. जागा स्वच्छ करून चटया अंथरण्याची जबाबदारी काही महिलांनी स्वीकारली तर बाकी महिला त्या दिवशीच्या दुपारची वाट बघत होत्या. एकत्र येण्याचा आनंद इतका की, घड्याळाच्या काट्याची गती कमी वाटायची. कोणी काय आणलं याची उत्सुकता ही वेगळीच! चला एकदाचा तो क्षण आला व सर्व कर्मचारी महिला ठरल्याप्रमाणे झाडाखाली निघाल्या. कार्यालयातील सर्व पुरूष कर्मचारी चहाकरीता निघून गेल्याने कार्यालयात फक्त महिलाराज होते. दुपारी दोन वाजतापासून आमची धांदल सूरू! रोजच्या पेक्षा आज नवीन पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद प्रत्येकीच्या चेहऱ्यावर जाणवत होता. आपण आज एकत्र येऊन मनसोक्त जेवणाचा आनंद घेऊ या आशेने तोंडाला पाणी सुटत होते. अखेर तो क्षण आला व आम्ही एकत्र बसलो. प्रत्येकीने आपापले डबे उघडताच येणारा सुगंध मंत्रमुग्ध करणारा होता. जिभेची लालसा थांबत नव्हती. प्रत्येकीने सर्वांच्या डब्यातील एक-एक पदार्थ ताटात घेऊन आम्ही जेवणाचा आस्वाद घेत रमलो होतो. काही पदार्थ अजूनही आपला नंबर येईल या आशेने रांगेत उभे होते. काही पदार्थ जेवणाच्या मध्ये खाऊया असे ठरले तर काही पदार्थांचा नंबर शेवटी लागणार होता. अगोदर कोणत्या पदार्थाचा आस्वाद घ्यावा या विचारात प्रत्येक जण होती. शेवटी आपल्या आवडीनुसार सुरूवात झाली व अनेक गप्पा रंगल्या.

कार्यालयात माहितीची देवाण-घेवाण करणेकरीता एक वायरलेस कक्ष होता. तेथील कर्मचाऱ्याने सांगीतले की, परिसरात माकडांची फौज उपस्थित झालेली आहे. असे संकेत मिळताच माकडं समोर तयार! आता काय! असे वाटले की, आपले पूर्वजच मेजवानीला आले की काय? त्या माकडांनी न मागताच त्यांचा आमच्या मेजवानीवर ताव मारण्याचा संपूर्ण बेत आखला होता. अख्खी फौजच ताव मारण्यासाठी सज्ज झालेली होती. मग काय? आम्ही महिला घाबरून त्यांना दूर हाकलून लावण्याच्या प्रयत्नात असतांनाच एका माकडाने चक्क आमच्या उपस्थितीत एका डब्यातील पोळ्यांवर ताव मारलाच! त्यामुळे बाकीच्या माकडांचं धाडस थोडं वाढलं आणि जसे जमेल तसे सर्व प्रत्येक पदार्थावर डोळा ठेवून असल्यासारखाच ताव मारू लागले. त्यांची गणना एवढी की, आम्ही त्या ठिकाणी कमी पडलो. सगळे सैरावैरा कार्यालयाकडे पळत सुटले. काही क्षणातच माकडांचं वादळ ओसरलं व आम्ही आमच्या डब्याकडे परतलो. पाहतो तर काय? पदार्थच नाही तर सगळे डबे इकडे- तिकडे विखुरलेले! प्रत्येकीने आपापल्या डब्याचा शोध घेतला. कोणी म्हणे माझा डबा नाही! कोणी म्हणे माझ्या डब्याचं झाकण नाही. सगळी तारांबळ उडाली होती. या सर्व गडबडीत आमच्या जेवणाचे स्वप्न स्वप्नच राहीले. कार्यालयाची वेळ झाल्याने सर्व मैत्रीणींमध्ये नाराजीचा सूर उमटला व यानंतर मधल्या सुट्टीत डब्यातील पदार्थांचा आस्वाद न घेताच कार्यालयात परतलो. जणूकाही पूर्वजन्मीच्या आप्तांनाच मेजवानी दिल्याचं सौभाग्य आम्हाला लाभलं असे म्हणायला काहीच हरकत नाही.

**निकीता कन्नमवार**
लेखापाल



अळवावरचं पाणी मोत्यासारखं दिसतं
अन् मातीत मिसळणारं स्वत्व विसरतं
पण मोत्यासारखं दिसणं क्षणभंगुर आहे
मातीत मिसळणं म्हणजे उद्या नवा अंकुर आहे...

मनिषा भिंगे



सूर्य उतरू लागला की अज्ञातातून या मुनिया मंद सुगंधासारख्या चिवचिवत येतात.
सीक-सीक-सीक करुन गवतावर उतरतात. आया-बाया, पोरं-टोरं एका जागी.
दिवसभराची करमकहाणी सांगतात. आवाज जणू दुधावरची साय.
पक्ष्यांच्या दुनियेतल्या या लाल पऱ्या. खरं तर यात पऱ्या सावळ्याच असतात, साधारण लालसर. लाल माणिक असतो तो परा. देखणा दिवा, लालबुंद.

अशा किलबील मंडळीतून उडून एक सुतनू अलगद गवताच्या तुऱ्याशी उतरते.
वेरुळच्या लेण्यांत जशी ती अभिसारिका नाजूक हाती त्याहून नाजूक कमलदल घेऊन तीन ठिकाणी डौलदार वळणानं उभी राहते, तशी ही लाजवंती चोचीत तुरा वाकवते.
एक दाणा खाते. खाता-खाताच रक्तिम नजरेनं आपल्याकडं संशयानं बघते.
तिच्या डौलाचं गारुड मोठं. आपली नजरबंदी होते. मग इकडं-तिकडं बघायचं भान रहात नाही.
अलीकडच्या गवताच्या तुऱ्यामागचा नर दिसतच नाही. तो दचकून उडतो.
सीक-सीक-सीक करत लाल-लाल पंख उघडून भुरकत अजून पलीकडं जातो.
त्याच्या चिमण्या अदर-पदर सावरत लगेचच उडतात आणि त्याची पाठराखण करतात.

– शतानिक भागवत




**"Chandrama"** is published by the Chandrapur Forest Academy of Administration, Development and Management, Chandrapur and printed at Renuka Publications, Chandrapur. The views and opinions expressed in the articles are those of the authors and do not necessarily reflect the official policy or position of the publisher.
Reproduction of any content is not allowed without a written permission of the publisher.
Please share your feedback / inputs on **directorchandrama@gmail.com**

**Editor in Chief : Maheep Gupta**, APCCF & Director, Chandrama **| Executive Editor : Piyusha Pramod Jagtap**, Addl. Director (Training) **|**
**Editor : Manisha Bhinge**, Dy Director **| Guest Editor : Shatanik Bhagwat**, DFO